| | | | |
|---|---|---|---|
| MHNB100008962023 | दाखल दिनांक | :- | २१.०७.२०२३ |
| | नोंदणी दिनांक | :- | २१.०७.२०२३ |
| | निकाल दिनांक | :- | १८.०३.२०२६ |
| | कालावधी | :- | ०२ वर्ष. ०७ महिने. २८ दिवस. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार यांचे न्यायालयात</u>**

(पीठासीन अधिकारी : विजय भि. शितोळे )

न्यायनिर्णय घोषित दिनांक – १८ मार्च, २०२६

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १८६/२०२३</u>**

**<u>निशाणी क्र.२४/ब</u>**

१. शबनुरबी मोहम्मद नफीस मक्राणी,
वय – ५५ वर्षे, व्यवसाय – काहीही नाही,

२. कु. साहिस्ताबानो मोहम्मद नफीस मक्राणी,
वय – २१ वर्षे , व्यवसाय – काहीही नाही,
दोघी रा. मोठी राजमोही, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार. ...... **<u>अर्जदार</u>**

**<u>वि रु ध्द</u>**

नफीस रशीद मक्राणी,
वय – ६० वर्षे, व्यवसाय – वाहनचालक,
रा. सितानगर, अक्कलकुवा,ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार. ....**<u>सामनेवाला</u>**

**<u>अर्ज</u>** : **<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळण्याकरीता</u>**

**विधीज्ञ** : श्री. एम.आय.मन्सुरी, अर्जदाराकरीता.
श्री. आर.एस.इंदिस, सामनेवालाकरीता.

# न्यायनिर्णय

## ( पारित दिनांक १८ मार्च, २०२६ )

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांचेविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ अन्वये पोटगी मिळावी याकरीता दाखल केलेला आहे.

**अर्जदारांचे अर्जातील कथन थोडक्यात की,**

०२. अर्जदारांचे कथन की, अर्जदार क्र १ हिचा विवाह मुस्लीम शरीयतनुसार व मक्राणी जमाअतीच्या चालरितीनुसार मोठी राजमोही येथे झालेला आहे. सदर लग्नात सामनेवाला याने रक्कम रुपये ७८६ मेहेर रोख अदा केलेले आहे. विवाहसंबंधातुन अर्जदार क्र २ ही मुलगी व सलमान उर्फ सलाउद्दीन हा मुलगा झालेला आहे. अर्जदार क्र १ व सामनेवाला यांचे पती पत्नीचे नातेसंबंध कायम आहेत.

०३. अर्जदाराचे पुढील कथन की, लग्नानंतर अर्जदार ही सामनेवालाकडे नांदण्यास गेली, त्यावेळी तिला काही दिवस सामनेवाल्यांनी संसार सुख दिले परंतु काही दिवसांनी सामनेवाला व त्याचे घरच्यांनी अर्जदार हिला शारीरिक व मानसिक त्रास देण्यात सुरुवात केली. शेतीच्या कामाकरिता व ट्रक घेण्याकरिता तिच्याकडे त्यांनी चार लाख रुपयाची मागणी केली. सामनेवाला हा कोणतेही कारण नसतांना अर्जदार हिला मारहाण करीत असे व टोमणे मारीत असे. अर्जदार क्र १ व सामनेवाला यांना एक मुलगा व एक मुलगी झाल्यानंतर देखील सामनेवाला याच्या स्वभावात फरक पडला नाही. सामानेवाला याने त्याच्या घरच्यांशी संगनमत करुन तिला त्रास देण्यास सुरवात केली. सन २०२२ मध्ये सामनेवाला याने अर्जदाराकडे शेती कामाकरिता व ट्रक घेण्याकरिता चार लाख

रुपयाची मागणी करुन तिला बेदम मारहाण करुन वाईट साईट शिवीगाळ केली. त्यामुळे अर्जदार माहेरी आली. त्यानंतर अर्जदार सामनेवाला व पंच मंडळी यांच्यात दिनांक ०१.०५.२०२३ रोजी बैठक झाली व त्यात सामनेवाला याने त्याची चुक मान्य करुन अर्जदाराला नांदविण्यास घेऊन जाण्यास तयार झाला. त्यानंतर सामनेवाला याने कोणतेही कारण नसतांना अर्जदार हिला पुर्वीप्रमाणे शारिरीक व मानसिक त्रास दिला. सन २०२२ मध्ये सामनेवाला व त्याच्या घरच्यांनी अर्जदार यांना बेदम मारहाण करुन घराबाहेर हाकलुन दिले. अर्जदार हि तिच्या आई वडिलांकडे तेव्हापासुन राहत आहे. सामनेवाला याने अर्जदार यांची कुठलीही तजवीज केलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०४. प्रस्तुत अर्जाची सामनेवाला याला नोटीस काढली असता, सामनेवाला हा विधीज्ञ श्री. आर.एस.इंदीस यांचेमार्फत दिनांक २२.०५.२०२४ रोजी हजर झाला. परंतु त्यांनी अर्जास खुलासा दाखल केला नाही. त्यामुळे दिनांक १९.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला यांचे जबाबाविना चालविण्यात आलेला आहे.

०५. प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असतांना अर्जदार यांनी नि.क्र २३ वर पुरशीस दाखल केली की, अर्जदार क्र २ हिचा विवाह झालेला असल्याने ती परघरात नांदण्यास गेली आहे, त्यामुळे तिचा पोटगी मागण्याचा हक्क अर्जदार मागे घेत आहे. अर्जदार क्र २ हिचा विवाह झालेला असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम १२५ (१) (c) प्रमाणे ती अपात्र आहे.

०६. वरील वाद कथनांवरुन अर्जाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित राहतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे–

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ असल्याचे सिध्द करतात का ? | होय. |
| २. | सामनेवाला याच्याकडे अर्जदार याचे पालनपोषण करण्याचे साधन आहे का ? | होय. |
| ३. | सामनेवाला याने अर्जदारांचे पालनपोषण करण्यास नकार दिल्याचे अर्जदार सिध्द करतात का ? | होय. |
| ४. | अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र आहेत का ? | अंशतः होय |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०७. अर्जदार हिने तिच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१६ वर दाखल केलेले आहे. सामनेवाला याचे वतीने तोंडी अथवा लेखी पुरावा दाखल केलेला नाही.

०८. अर्जदार क्र.१ हिने मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र नि.क्र.२१ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार हिने मक्राणीफळी येथील मालमत्ता क्र ८४ चा नमुना ८ चा उतारा नि.क्र २३ वर दाखल केलेला आहे. सामनेवाला याने त्याचे मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही.

०९. अर्जदारा यांच्या वतीने विधीज्ञ श्री. एम.आय.मन्सुरी, यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. सामनेवाला यांच्यावतीने विधीज्ञ श्री. आर.एस.इंदिस, यांनी युक्तीवाद केला नाही.

## मुद्दा क्र.१ ते ४ करीता :–

१०. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी सलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्र चर्चिले आहेत.

११. अर्जदार क्र.१ हिने तिच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१६ वर दाखल करुन तिने तिच्या अर्जातील कथनांचे पुनरुच्चार केलेला आहे. त्यात तिने कथन केले की, सामनेवाला याने कोणतेही कारण नसतांना तिला घरातुन बाहेर हाकलुन दिलेले आहे. सामनेवाला हा अर्जदार हिला मारहाण करीत होता. सामनेवाला याला पुरेशी संधी देऊन देखील त्याने अर्जदार हिचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिने तिच्या पुराव्याचे शपथपत्रात केलेले कथन हे विनाआव्हानीत राहिलेले आहे.

१२. अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, अर्जदार यांनी सामनेवाला याने कोणतेही कारण नसतांना घरातुन हाकलुन दिलेले आहे. अर्जदार क्र.१ ही तिच्या माहेरी राहते. सामनेवाला याने अर्जदार हिच्याकडे शेती कारणासाठी व ट्रक घेण्याकरिता ४,००,०००/– रुपयाची मागणी केलेली आहे. अर्जदाराचा उलटतपास सामनेवाला याने न घेतल्यामुळे अर्जदारांचा पुरावा हा विनाआव्हानीत राहिल्याने अर्जदार ही तिच्या माहेरी सामनेवाला याने हाकलुन दिल्यामुळे राहत असल्याचे स्पष्ट होते.

१३. अर्जदार हिने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रात कथन केले की, तिला कुठलाही कामधंदा येत नसल्याने तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच तिने तिचे मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र देखील तिला उत्पन्नाचे साधन नसल्याचे तिने कथन केले आहे. याउलट अर्जदार क्र.१ हिला उत्पन्नाचे साधन नसल्याबाबत सामनेवाला याने कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे अर्जदार हे स्वतःचे पालनपोषण

करण्यास असमर्थ असल्याचे दिसुन येते.

१४. अर्जदार माहेरी असल्यापासुन अर्जदारांच्या पालनपोषणाकरीता सामनेवाला याने कोणतीही तजवीज केली नसल्याचे अर्जदाराने कथन केले आहे. याउलट सामनेवाला याने अर्जदार माहेरी राहत असल्यापासुन काय तजवीज केली याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यापासुन अर्जदारांचे पालनपोषणाकरीता सामनेवाला याने काय तजवीज केली याबाबत देखील कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे सामनेवाला याने अर्जदारांचे पालनपोषन करण्यास नाकारले किंवा दुर्लक्ष केले असल्याचे सिध्द होते.

१५. अर्जदाराचे कथनाप्रमाणे सामनेवाला हा ट्रक चालक असुन त्याला दरमहा पन्नास ते साठ हजार रुपये उत्पन्न आहे. परंतु त्यास नेमके किती उत्पन्न आहे याबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. सामनेवाला हा वाहनचालक असल्यामुळे त्याला उत्पन्नाचे साधन असलयाचे दिसुन येते. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला याची पत्नी असल्याने त्यांचे पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला यांच्यावर आहे. सामनेवाला याने त्यांच्या पालनपोषणाकरीता कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. त्यामुळे सामनेवाला हा पती या नात्याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहकरीता आर्थिक तजवीज करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ हीला दरमहा १०००/– पोटगी सामनेवाला याने द्यावी असे न्यायोचित वाटते. सबब, मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीता :–**

१६. मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्षावरुन अर्ज अंशतः मंजुर करणे न्यायोचित वाटते. सबब, मुद्दा क्र.५ करीत खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>**आ दे श**</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला याला आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्र.१ हिला रक्कम रुपये १,०००/– दरमहा पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दिनांक २१.०७.२०२३ पासुन द्यावी.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात पारित व घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY BHIMRAO SHITOLE
Date: 2026.03.18 17:42:12 +0530

ठिकाण–अक्कलकुवा.
दिनांक – १८.०३.२०२६.

**( विजय भि. शितोळे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग–१,
अक्कलकुवा, जि. नंदुरबार.

# <u>दा ख ला</u>

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | हार्दिक दौलतभाई वाघ |
| न्यायालयाचे नाव | :– | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | :– | १८.०३.२०२६ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | १८.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | १८.०३.२०२६ |